**वाहतुक शाखा, पुणे शहर**
**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे**

**जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ ९३६५ /२०२३** **दिनांक :- २९/१२/२०२३**

## प्रसिध्दीपत्रक

पुणे नगर मार्गावरील पेरणेफाटा येथे सालाबादप्रमाणे दि. ०१/०१/२०२३ रोजी जयस्तंभास मानवंदना देण्यासाठी राज्यातील व राज्याबाहेरील नागरिक, विविध संघटना सामील होत असतात. पुणे, मुंबई सातारा, सांगली, कोल्हापूर या भागातून जयस्तंभाकडे जाणाऱ्या अनुयायींच्या वाहनांकरीता पुणे नगर रोड हा मुख्य मार्ग असून अनुयायींची सर्व वाहने एकाचवेळी नगर रोडवरुन जयस्तंभाकडे जात असतात. त्यामुळे नगर रोडवरील दोन्ही लेनवर मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे.

पुणे नगर रोडवर होणारी वाहतूक कोंडी टाळण्याकरीता पुणे नगर रोडवरील विमाननगर चौक ते खराडी जुना जकात नाका या दरम्यानच्या बी.आर.टी. मार्गावरील दोन्ही लेन जयस्तंभास मानवंदना देण्यासाठी जाणाऱ्या-येणाऱ्या अनुयायांच्या वाहनांकरीता खुल्या केल्यास जयस्तंभाकडे जाणाऱ्या व परत येणाऱ्या वाहनांकरीता जास्त जागा उलब्ध होवून वाहतूक कोंडी टाळता येईल. याकरीता मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे सूचनांनुसार अनुयायांची निकड लक्षात घेता व वाहतूक कोंडी टाळण्याकरीता पी.एम.पी.एम.एल. चे व्यवस्थापकीय संचालक यांनी त्याप्रमाणे अनुमती दिली आहे. दि. ३१/१२/२०२३ ते दि. ०१/०१/२०२४ या कालावधीत विमाननगर चौक ते खराडी जुना जकात नाका या दरम्यानचा बी.आर.टी. मार्गावरील दोन्ही लेन जयस्तंभास मानवंदना देण्यासाठी जाणाऱ्या अनुयायांच्या वाहनांकरीता खुल्या राहतील व नगर रोडवरील वाहतूक कोंडी सोडविण्यास मदत होईल.

**(विजयकुमार मगर)**
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक,
पुणे शहर

**प्रत :- सर्व संबधितांना.**